# सायबर क्षेत्रातून समाजात विष कालविले जात आहे - नागराज मंजुळे

पुणे : इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून घडणाऱ्या सायबर गुन्ह्यांना कुठलीही मर्यादा राहिलेली नाही. सायबरच्या चांगल्या बाजूही आहेत; परंतु या माध्यमातून सध्या समाजामध्ये विष कालविले जात असल्याची खंत प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी व्यक्त केली.

सायबर गुन्हे क्षेत्रासंदर्भात जनजागृतीसाठी पुणे पोलीस आणि 'क्विक हील'फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या साय फाय एकांकिका करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीचे उद्‌घाटन नागराज मंजुळे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. ज्येष्ठ रंगकर्मी विक्रम गोखले, 'क्विक हील'चे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, सायबर क्राईम विभागाचे पोलीस उपायुक्त सुधीर हिरेमठ, प्रदीप वैद्य यावेळी उपस्थित होते. शंभरहून अधिक स्पर्धकांपैकी १६ संघांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे.

